**रे.दि.मु.क्र.४९/२०२०**

(बाबू वि. बाळाराम)

## आदेश नि.१०७ खाली

(आदेश पारीत दि.०१/०२/२०२४)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांचे विरुध्द पारीत करण्यात आलेला ''उलट तपास नाही'' चा आदेश रद्द करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे कथन–**

२. दि.२९/०१/२०२४ रोजी त्यांचे विरुध्द उलट तपास नाहीचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. परंतु प्रतिवादीकडून पुरेशी माहिती व कागदपत्र उपलब्ध न झाल्यामुळे प्रतिवादीतर्फे उलट तपास घेणे शक्य झाले नाही. वादीचा उलट तपास घेणे अत्यंत आवश्यक आहे. उलट तपास घेण्याची संधी न दिल्यास प्रतिवादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसार होईल. सबब त्यांचे विरुध्द पारीत करण्यात आलेला उलट तपास नाहीचा आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**वादीचे म्हणणे–**

३. दावा हा सन २०२२ मधील आहे. वादी हा दावा चालविण्यास तयार आहे. त्याने दोन साक्षीदारांचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे. प्रस्तुत साक्षीदाराचा उलट तपास हा दि.२४/०५/२०२३ पासून प्रलंबीत आहे. अर्जामधील नमुद कारण योग्य व संयुक्तीक नाही. तरी अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे. तसेच अर्ज मंजूर करायचा ठरविल्यास जास्तीत जास्त खर्च प्रतिवादीवर लादण्यात यावा अशी देखील विनंती केली आहे.

४. अर्जाचे, म्हणण्याचे, अभिलेखाचे अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि.२९/०१/२०२४ रोजी उलट तपास नाहीचा आदेश पारीत करण्यात आला आहे. वादीने याकामी दि.२४/०७/२०२३ रोजी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. तद्नंतर दि.१७/०८/२०२३ रोजी वेळोवेळी संधी देवून देखील उलट तपास घेतला नाही म्हणून प्रतिवादी विरुध्द उलट तपास नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. त्या नंतर देखील उलट तपास प्रतिवादीतर्फे घेण्यात आला नाही म्हणून

दि.२९/०१/२०२४ रोजी पुन्हा उलट तपास नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. अर्जामधील नमुद कारणे ही उलट तपास न घेण्यास संयुक्तीक नाही. परंतु प्रतिवादीने पुन्हा उलट तपास घ्यावयाचा मनोदय व्यक्त केला आहे. त्यामुळे एक शेवटची संधी म्हणून व झालेल्या विलंबाचा खर्च त्याचेवर लादून अर्ज मंजूर करणे उचित राहिल. सबब वरील सर्व कारणांचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे विरुध्द पारीत करण्यात आलेला ''उलट तपास नाही'' चा आदेश प्रतिवादींनी वादीस एकत्रीतरित्या रक्कम रु.१२००/–खर्च म्हणून देण्याचे अटीवर रद्द करण्यात येतो.

२. सदर आदेशाची पुर्तता प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी करुन पुढील तारखेस उलट तपास घ्यावा. तसे प्रतिवादीने न केल्यास उलट तपास नाहीचा आदेश कायम करण्यात येईल याची प्रतिवादीने नोंद घ्यावी.

दिनांक ०१/०२/२०२३.

(एम.आर. काळे)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
चिपळूण.